**<u>अत्यंत तातडीचे</u>**

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा
अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुके/१/कावि/ ९६ /२०१७
दिनांक :- १३ /०४/२०१७

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत श्री.सुहास हळदणकर यांनी सादर केलेल्या अर्जांची माहिती पाठविणेबाबत...**

**संदर्भ :- मा. राज्य माहिती आयुक्त यांचेकडील दि. १२/०४/२०१७ रोजीचा ई-मेल**

**परिपत्रक,**

मा. राज्य माहिती आयुक्त यांचेमार्फत प्राप्त झालेल्या संदर्भिय ई-मेलनुसार दि.०१/०३/२०१६ ते दि.०७/०४/२०१७ या कालावधीत माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.सुहास हळदणकर यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जांची सविस्तर माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत ऑनलाईन अर्ज स्विकृतीकामी संगणक प्रणाली विकसीत केलेली असून सदर प्रणाली कार्यान्वित आहे. तथापि, विविध विभागांकडे प्राप्त होणारे लेखी स्वरूपातील अर्जांची नोंद सदर प्रणालीमध्ये घेणेकामी आवश्यक सुविधा उपलब्ध करून व वारंवार लेखी कळवून देखील संबंधितांकडून माहिती अधिकार अर्जांची नोंद संगणक प्रणालीमध्ये घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी सदरची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस उपलब्ध नाही. सदरची बाब गंभीर स्वरूपाची आहे. सदर बाबत यापुढे सुधारणा होणे अपेक्षित आहे.

तथापि, आपले विभागात श्री.सुहास हळदणकर यांनी दि.०१/०३/२०१६ ते दि.०७/०४/२०१७ या कालावधीत माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जांची सविस्तर माहिती खालील नमुन्यात आज दि.२१/०४/२०१७ पर्यंत नागरी सुविधा केंद्र विभागास ई-मेलद्वारे / लेखी पत्राद्वारे पाठविणेत यावी. सदरची माहिती निरंक असल्यास तसा निरंक अहवाल पाठविणेत यावा.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | अर्ज दिनांक | विषय | केलेल्या कार्यवाहीचा तपशील | पूर्तता दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

मा. राज्य माहिती आयुक्त यांचे आदेशानुसार सदरची माहिती तात्काळ महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असलेने याकामी विलंब होता कामा नये. अन्यथा संबंधित विभागप्रमुख / संबंधितांस जबाबदार धरणेत येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८